# नाशिक महानगरपालिका, नाशिक

## विविधकर विभाग

## ई-कोटेशन नोटीस

**कामाचे नांव**:-नाशिक महानगरपालिकेच्या विविधकर विभागातील संगणक प्रिंटर्स करीता लागणारे टोनर रिफीलींग करणे, नविन टोनर पुरविणे,टोनर ड्रम बदलणे,टोनर ब्लेड बदलणे इत्यादी कामासाठी वार्षिक दर मंजूर करुन त्या दराने काम करणेस अनुभवी पुरवठादार व व्यवसायिक यांचेकडून कोटेशन मागविण्यात येत आहे.

**कोटेशन फॉर्म मिळण्याचे ठिकाण**:-ज्या कोणास सदरचे काम करावयाचे असल्यास त्यांनी कोटेशन फॉर्म विविधकर विभाग,राजीव गांधी भवन,मनपा मुख्यालय येथुन कार्यालयीन वेळेत घेवुन जावेत.

**काम करणेचे ठिकाण**:-नाशिक महानगरपालिका,नाशिक

**कोटेशन फॉर्म मिळण्याचे तारीख**:- २७/०५/२०१७ ते ३१/०५/२०१७

**कोटेशन जमा करण्याची अंतिम तारीख**:- ३१/०५/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजे पर्यंत.

**कोटेशन उघडण्याची तारीख**:-३१/०५/२०१७ रोजी दुपारी ३.३० वाजे नंतर

**कोटेशन जमा करण्याचे ठिकाण**:-विविधकर विभाग,नाशिक महानगरपालिका,नाशिक.राजीव गांधी भवन, शरणपुर रोड,नाशिक

### अटी/शर्ती

१) कोटेशन पाकिट सादरीकरणाची अंतिम मुदत दिनांक ३१/०५/२०१७ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत राहील. मुदतीनंतर प्राप्त झालेले कोटेशन पाकिट स्विकारले जाणार नाही.
२) सदरचे साहित्य मनपा विविधकर मुख्यालय,राजीव गांधी भवन, शरणपुर रोड, किंवा आदेशात नमुद केल्या ठिकाणी पोहोच करावे लागेल. त्यासाठी वेगळा वाहतुक खर्च देण्यात येणार नाही.
३) सदरचे दरपत्रकात सर्व करासह दर नमुद करावयाचे आहेत. कोणत्याही कराची जबाबदारी नाशिक महानगरपालिकेवर राहणार नाही.
४) कोणतेही कोटेशन स्विकारणे अगर नाकारण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील.
५) कोटेशन धारकाचे ओळखपत्र,रहीवासी पुरावा (उदा.ओळखपत्र म्हणुन आधारकार्ड/पॅनकार्ड रहीवासी पुरावा म्हणुन लाईटबिल,घरपट्टी पावती इत्यादी.) सोबत जोडावे.
६) टोनर रिफीलिंग करणे ,नविन टोनर पुरविणे ,टोनर ड्रम बदलणे, टोनर ब्लेड बदलणे इत्यादी स्वरुपाची कामे विविधकर विभाग येथेच करावी लागतील.
७) कोटेशन चे दर मंजुर झाल्यास पुरवठाधारकाने मालाच्या पुरवठा करणेबाबत रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा व जामीननामा करुन द्यावा लागेल.
८) काम असमाधानकारक असल्यास करारनामा रद्द करण्याचा अधिकार निम्नस्वाक्षरीकार यांचा राहील.
९) कुठल्याही प्रकारे आगाऊ रक्कम उचल देता येणार नाही. दर तीन महिन्यांनी झालेल्या कामाचे बिल सादर करावे.
१०) लेखा व लेखापरीक्षण यांचे आदेश/सूचने नुसार सरकारी कर बिलातुन वजावट करणेत येईल.

**Sd/-**
उपआयुक्त (विविधकर)
नाशिक महानगरपालिका, नाशिक

# नाशिक महानगरपालिका, नाशिक

विविधकर विभाग

## कोटेशन फॉर्म

## सन २०१७-२०१८

**कामाचे नांव** : नाशिक महानगरपालिका,नाशिक विविध कर विभागातील संगणक प्रिंटर्स करीता लागणारे नविन टोनर,टोनर रिफीलींग,टोनर नविन ड्रम तसेच टोनर नविन ब्लेड पुरविणेकामी वार्षिक दर मंजुर करुन त्या दराने आवश्यकतेनुसार वेळोवेळी पुरवठा करणे बाबत.

**कामाची मुदत** : १२ महिने.

**कोटेशन सादर करण्याची अंतिम मुदत** : दिनांक ३१/०५/२०१७. रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत.

**कोटेशनधारकाचे नांव व पत्ता** :

**संपर्क क्रमांक** :

उपरोक्तप्रमाणे कामाचे अटीशर्ती व स्पेशिफिकेशननूसार साहित्य पुरविणेकामी मी/आम्ही पुढीलप्रमाणे सर्व करांसह दर सादर करीत आहोत.

| अ.क्र. | तपशिल | दर सर्व करासह र.रु. | प्रमाण/एकक |
|---|---|---|---|
| १. | Richo SP210 प्रिंटर्स टोनर रिफीलींग करणे. | | प्रति नग |
| २. | Richo SP210 प्रिंटर्स करीता नविन टोनर पुरविणे. | | प्रति नग |
| ३. | Richo SP210प्रिंटर्स करीता टोनर ड्रम पुरविणे | | प्रति नग |
| ४. | Richo SP210 प्रिंटर्स करीता टोनर ब्लेड पुरविणे | | प्रति नग |

सदर कोटेशनसोबत असलेल्या सर्व अटी व शर्ती मी वाचले असुन मला त्या मान्य आहेत. सदर अटी शर्ती प्रमाणे सदर कोटेशनमध्ये नमुद केलेल्या दराने १२ महिने कालावधीकरीता पुरवठा करण्यास मी तयार आहे. त्यासाठी या कोटेशनवर स्वाक्षरी करीत आहे.

**दिनांक :- / /२०१७.**

**कोटशनधारकाची सही व शिक्का**